MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

UGC Approved
Sr.No.8431, 7912, 4673, 7775, 7790

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

April To June 2017
Issue-18, Vol-011

Editor
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

### ❖ Editorial Board ❖

1) Dr. Vikas Sudam Padalkar **(Japan)**
2) M.Saleem, Sialkot **(Pakistan)**
3) Dr. Momin Mujtaba **(Saudi Arebia)**
4) Dr. Anupama Alvikar **(Turkey)**
5) N.Nagendrakumar **(Sri Lanka)**
6) Dr. Wankhede Umakant **(Maharashtra)**
7) Dr. Dixit Kalyani **(Lucknow)**
8) Dr. Basantani Vinita **(Pune)**
9) Dr. Upadhya Bharat **(Sangali)**
10) Dr. J. David Livingston **(Thirupathy)**
11) Dr. Kachare S. V. **(Parli-V)**
12) Dr. Jubraj Khamari **(ORISSA)**
13) Krupa Sophia Livingston **(Tamilnadu)**
14) Dr. Umesh chandr Shukl **(Mumbai)**
15) Dr. Ambhore Shankar **(Jalna)**
16) Dr. B.J.Patel **(Gujrat)**
17) Manmeet Kaur ((**Uttrakhand**) )
18) Dr. Sunil S. Trivedi **(Gujrat)**
19) Dr. Ravindra Kewat **(Chandrapur)**
20) Preeti Sarda **(Hyderabad)**
21) Prof.Surwade Yogesh **(Satara)**

### ❖ Advisory Committee ❖

1) Dr. Chodhari N.D. **(Kada)**
2) Dr. Yallawad Rajkumar **(Parli v.)**
3) Dr. Yerande V. L. **(Nilanga)**
4) Dr. Shinde Sunil **(Parbhani)**
5) Dr. Awasthi Sudarshan **(Parli v.)**
6) Ghante Pradipkumar , **Solapur (MS)**
7) A. Durga Prasad, **Telangana**
8) Dheeraj Kumar Pandey, **Varanasi (U.P.)**
9) Prof. Machale Ravinda **(Parli v.)**
10) Vipin Panday, **Kanpur (U.P.)**
11) Dr.V.Aruna, **Chennai (Tamilnadu)**
12) Dr. Avineni Kishor, **Kuppam(Kerala)**
13) Prof. Deshmukh Suryakant **(Parli v.)**
14) 23) Dr. Dhaigude R. B. **(Parli v.)**
15) Dr. Rajendra Acharya **(Parli v.)**
16) Dr. Manoj Kr Sharma **(Haryana)**
17) Dr. Rajesh Chandra Paliwal **(Uttrakhand)**
18) Dr. Suresh Babu **(Hyderabad)**
19) Deepak Nema **(M.P.)**
20) Dr. Piyush Pandey **(New Delhi)**
21) Dr. Vidya Gulbhile **(M.S.)**


UGC Approved Journal
UGC Approved Sr.No.8431, 7912, 4673, 7775, 7790

IMPACT 4.014 iijif FACTOR



Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Vidyawarta' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university,institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Vidyawarta is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)



Scanned with CamScanner

23

# अभिजात मराठी भाषेतील श्रेष्ठ गद्य वाङ्मयाचे आदिकारण : श्री चक्रधर स्वामी

डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक

***********

मराठी भाषेचा उगमकाल व उगमकालीन स्वरुप जाणून घेण्यासाठी तत्कालीन ताम्रपट, शिलालेख, ग्रंथ यांचा अभ्यास आवश्यक ठरतो. त्याआधारे तिचा उगमकाल व उगमकालीन स्वरुप निश्चित करताना अभ्यासकांनी विविध मतमतांतरे मांडलेली दिसतात. त्यासंदर्भात १) वैद्य-गुणे वाद, २) मराठी व संस्कृत नाते- वि. का. राजवाडे, ३) प्राकृत भाषा व मराठी- ज्यूल ब्लोक व डॉ. भांडारकर ४) अपभ्रंश भाषा व मराठी- डॉ. शं. गो. तुळपुळे ५) कनाडी भाषा व मराठी- शं. बा. जोशी, वि. रा. शिंदे, ६) तामिळ- मराठीचा अनुबंध- विश्वनाथ खैरे इत्यादी अभ्यासकांनी मराठी भाषेचा इतर भाषांशी अनुबंध दर्शवून तिचा जन्म-जनक संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याआधारे मराठीचा उगमकाळ इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत मागे नेला जातो. परंतु कोणतीही भाषा एकाएकी उद्भवत नाही. आज प्रचलित असलेल्या भाषेला अनेक शतकांचा इतिहास लाभलेला असतो. भाषेच्या जन्माची प्रक्रिया प्रदीर्घ काळ चालू असते. कालौघात भाषांमध्ये बदल होत असतो. कधी भाषेतील शब्दांचे औच्चारिक स्वरुप बदलते, कधी अर्थ बदलतो, शब्दसंग्रहात हळूहळू बदल होत असतो. काही शब्द वापरातून नाहिसे होतात तर काही वेळा अन्य भाषांशी संबंध आल्यामुळे नवे शब्द भाषेत स्वीकारले जातात, तर काही शब्द गरजेनुसार नव्याने घडविले जातात. विविध कारणांमुळे हे भाषिक परिवर्तन होत असते. मात्र भाषेच्या उत्तरकालीन अवस्थेत पूर्व भाषेची अनेक वैशिष्ट्ये कायम राहतात. त्यांच्यात ध्वनी, व्याकरण आणि शब्दसंग्रह या सर्व पातळ्यांवर साम्य आढळते. त्यामुळेच भाषांचा उगमकाळ व जनकभाषा यांच्या संबंधीची अनेक मत-मतांतरे संभवतात.

अलीकडच्या काळात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट स्थापन केला. त्या अभ्यासगटाने संशोधन करुन मराठीचा उगमकाळ २००० वर्षे मागे नेला आहे. त्याअनुषंगाने 'मराठी भाषा ही अभिजात भाषा आहे' असा विचार नव्याने करणे सुरु झाले. त्यासाठी विविध अभ्यासकांची मतेही पुरावा म्हणून स्वीकारली गेली. ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर, राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, वा. वा. मिराशी, डॉ. कृ. पां. कुलकर्णी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. शं. गो. तुळपुळे, ल. रा. पांगारकर, डॉ. ह. वि. सांकलिया आणि इतर अनेक मान्यवरांच्या ग्रंथांचे पुरावे पाहता मराठीचे वय सुमारे २५०० वर्षे असल्याचे दिसते. मराठी भाषेच्या पूर्वरुपांचे 'प्राचीन महाराष्ट्री भाषा, मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा असा मराठीचा प्रवास झाला आहे. या वेगवेगळ्या भाषा नसून ती मराठी या एकाच भाषेची तीन रुपे आहेत' असे ल. रा. पांगारकर यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी विवेकसिंधू हे मराठीतले आद्यग्रंथ नाहीत; तर ते मराठी प्रभल्भ व श्रीमंत झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. हे जागतिक तोडीचे ग्रंथ आठशे वर्षापूर्वी ज्या भाषेत लिहिल्या गेले, ती त्याच्या आधी बारा-पंधराशे वर्षे अत्यंत समृद्ध भाषा होती याचे शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखीत ग्रांथिक पुरावे आज उपलब्ध झाले आहेत. मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ सुमारे २ हजार वर्षे जुना असून त्याचे नाव 'गाथासप्तशती' असे आहे. हा ग्रंथ हाल सातवाहन राजाने संकलित केलेल्या गाथांचा संग्रह आहे. इ.स. पूर्व २ रे शतक ते इ.स. २ रे शतक हा सातवाहनाच्या राजवटीचा कालखंड असून त्यांचा कुरुक्षेत्र, पेशावर इथपर्यंत राज्यविस्तार असल्यामुळे महाराष्ट्री प्राकृत भारताच्या बऱ्याच मोठ्या भूभागात प्रचलित होती. त्यामुळेच या भाषेत निर्माण झालेल्या 'गाहासत्तसई' उर्फ 'गाथासप्तशती' या ग्रंथाच्या प्रतींची हस्तलिखिते देशभर अनेक ठिकाणी सापडलेली आहेत.

महाराष्ट्रामध्ये यादवांपूर्वी राष्ट्रकूटांची राजवट होती. राष्ट्रकूट घराण्यातले पहिला सम्राट अमोघवर्ष व त्यानंतरचे कृष्ण, तिसरा इंद्र इत्यादी सारेच जैनश्रावक होते. त्यामुळे या काळात राजदरबारींसह सर्वसामान्य लोकांवरही जैन धर्माचा प्रभाव पडू लागला होता. सहाव्या शतकापासून जैनांना हा राजाश्रय लाभला होता. जैन धर्माचा प्रसार होण्यासाठी त्यांनी लोकभाषेतील



Scanned with CamScanner

लोककथांचा आधार घेतला. ह्या कथांच्या माध्यमातून लोकांपर्यंत तीर्थंकर प्रणीत तत्त्वज्ञान जावू लागले. महाराष्ट्रभर अधिराज्य गाजविणाऱ्या शातवाहनांपासून तो यादवांपर्यंत सर्व राजवंशाची ब्राह्मणांवर श्रद्धा होती. शातवाहन, वाकाटक, कलचुरी हे तीनही वंश ब्राह्मणच होते. क्षत्रप व आभीर हे आदिवासी, परंतु पुढे ब्राह्मणांत सामावले गेले. यादव स्वत: क्षत्रिय, परंतु ब्राह्मण व ब्राह्मण्यावर त्यांची अगाढ श्रद्धा होती. ब्राह्मण पंडितांनी हिंदु धर्मांचे ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिण्याची परंपरा काटेकोरपणे जपली होती. रामदेव यादव राज्याच्या पदरी हेमाद्री प्रधानमंत्री होता. हेमाद्री खुद हिंदूधर्मांचा कट्टर पुरस्कर्ता होता. हिंदूधर्मांच्या पुनरूज्जीवनासाठी त्याने अनेक धर्मग्रंथांची रचना केलेली आहे. त्यापैकी चतुर्वर्ग चिंतामणी हा ग्रंथ अतिशय मोठा असून त्याचे व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड व परिशेष खंड असे पाच भाग आहेत. व्रतखंड या ग्रंथात दर दिवसाला व दर तिथीला कोणकोणती प्रचलित दहा दहा-पाच पाच व्रते आहेत हे सांगितले आहे. व त्या त्या व्रताला कोणत्या देवाची पूजा-अर्चा करून, कोणकोणते पक्वान्न करून किती ब्राह्मणांना खाऊ घालायचे आणि प्रीती संपादन करायची याची शहानिशा श्रुती, स्मृती, पुराणे यातील उतारे देऊन केली आहे. या काळात व्रतवैकल्यांचा जोर होता. अनेक देवदेवता पूजन, चातुर्वर्ण्य यांचा सुळसुळाट विमुक्तपणे झाला होता. अशा वेळी देवतोपासनेचा मार्ग अयोग्य आहे. हे जनतेला सांगून परमेश्वराच्या खऱ्या भक्तीचा मार्ग दाखविण्याचे काम महानुभाव पंथ प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामींनी केले. त्याकाळी चालणारी तत्त्वचर्चा आणि होत असलेली साहित्यनिर्मिती ही काशी-काश्मिरापासून ते पुरी रामेश्वरापर्यंत सर्वत्र सारख्याच घाटाची होती. त्या ज्ञानोपासनेची तऱ्हा आणि प्रणाली एकसारखी होती. संस्कृत ही या विद्वान पंडितांची प्रतिष्ठा प्राप्त देववाणी मानल्या जात होती. विद्वानांची भाषा म्हणून संस्कृतला भारतभर मान होता. संस्कृतशिवाय तत्त्वज्ञान बोलणे एक प्रकारचे पाप समजल्या मानल्या जात होते. त्यामुळे देशी भाषा ही सामान्यांच्या व्यवहारापुरतीच वापरात होती. तिच्या विकासाचे सर्व मार्ग खुंटले होते. परंतु श्रीचक्रधर स्वामींनी मात्र मराठी भाषेच्या विकासाच्या आड असलेला हा अडथळा दूर सारुन तिला तत्त्वचिंतनाचे माध्यम बनवून देववाणीचा दर्जा दिला. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनांना समजेल असे त्यांच्याच भाषेत सांगितले.

यादवपूर्व काळात संस्कृत भाषेला संस्कृत हे नाव मिळण्याआधी महाराष्ट्री भाषा अस्तित्वात होती असे अलीकडच्या काळातील संशोधन सांगते. महारट्टी-मरहट्टी-मऱ्हाटी-मराठी असा तिच्या उच्चारभ्रमाचा प्रवास दाखविला जातो आणि महाराष्ट्री हे महारट्टीचे नामकरण संस्कृत भाषेने, तिच्यातल्या पंडितांनी केले असे सांगितले जाते. या संशोधनानुसार ही भाषा प्रगल्भ झालेली होती. हाल सातवाहनाची 'सत्तसई', जयवल्लभाचा 'वज्जालग्ग' हा सुभाषित कोश, प्रवरसेन वाकाटकाचे 'रावणवहो' वाक्पतीराजाचे 'गरुडवहो' ही महाकाव्ये हे महाराष्ट्री प्राकृतातील प्रमुख ग्रंथ आहेत. याचबरोबर सर्वसामान्य जनांमध्ये प्रचलित असलेले लोकसाहित्य-लोकगीते, लोककथा, ओव्या-अभंग, ज्योतिष वैद्यकाची बाडे यांसारखी निर्मिती या काळात झालेलीच असणार याचा पुरावा आपल्याला लीळाचरित्र, गोविंदप्रभू चरित्र, महदंबेचे धवळे यासारख्या ग्रंथांमध्ये दिसून येतो. त्यापैकी ओवी हा मराठी लोकसाहित्याचा प्राचीनतम प्रकार असणार. मराठीतील ओवी ही जानपद स्वरुपाची आहे व ती मूळात गेय आहे. ओवीची ही वैशिष्ट्ये तिसऱ्या सोमेश्वर लिखीत 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थ चिंतामणी' या विश्वकोश सदृश ग्रंथात सूचित झाली असून महाराष्ट्रातील स्त्रिया दळणकांडण करताना ओव्या गात अशा अर्थाचा स्पष्ट उल्लेख त्यात मिळतो, म्हाइंभटकृत गोंदिप्रभूचरित्रात कांडतांना गायलेल्या लीळेचा उल्लेख आहे. असे हे लोकवाङ्मय तत्कालीन मराठीत लोकांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे जन्माला आले असावे, परंतु ते लेखनविष्ट न झाल्याने ते जसे निर्माण झाले तसे निमालेही असेल. मात्र जाणीवपूर्वक मराठी भाषेचा वापर करण्याचा आग्रह प्रथमच श्री चक्रधर स्वामी यांनी धरलेला दिसतो. त्यामुळेच म्हाइंभट, नागदेवाचार्य, केशिराजव्यास, भास्करभट्ट बोरीकर, इत्यादी त्यांच्या शिष्यपरिवारातील संस्कृत पंडितांनी मराठीत रचना केलेल्या आहेत.

म्हाइंभटांनी संकलित केलेल्या लीळाचरित्रात स्मरणभक्तीतून लेखन केलेल्या लीळांत श्री चक्रधरांच्या मुखीची तत्त्वज्ञानयुक्त सूत्ररचना, छोट्या छोट्या गोष्टी, दृष्टांत, तत्कालीन भाषेतील संवाद तसेच जनसामान्यांची भाषा आलेली आहे. या ग्रंथावरच महानुभाव पंथाच्या वाङ्मयाचा डोलारा उभा राहिलेला आहे. म्हाइंभट संस्कृत भाषेचे प्रगाढ पंडित असूनही केवळ चक्रधरांच्या मराठी भाषेवरील प्रेमामुळेच त्यांनी हा जागतिक दर्जाचा श्रेष्ठ ग्रंथ मराठी भाषेत लिहिला. त्यामुळेच पुढील काळात मराठी वाङ्मयाचा प्रवाह अखंडीतपणे सुरु झाला. वर्तमानकाळात उपलब्ध असलेल्या पुराव्यांनुसार पहिला मराठी उद्गार श्री चक्रधर स्वामी यांच्या श्रीमुखीचा आहे असे लीळाचरित्रात दिसते. श्री चक्रधरांच्या एकांक काळात शके ११६२ (इ.स. १२४०) मध्ये



Scanned with CamScanner

ते अमरावती जिल्ह्यातील पाळे-देवठाणे या गावाजवळ होते. तेव्हा जवळच असलेल्या सालबर्डीच्या डोंगरात ते गेले. तेथे झाडाखाली स्वामी बसले असता पारध्यांपासून जीव वाचविण्यासाठी जीवाच्या आकांताने एक ससा तेथे आला व त्यांच्या मांडीखाली लपला. स्वामींनी त्याला अभय दिले. पैजेसाठी सशाला मारण्यासाठी आलेल्या क्रूर पारध्यांना स्वामींनी शांत केले व गरीब, मुक्या प्राण्यांची हिंसा करु नका असा उपदेश केला. शिवाय 'हां गा: एथ शरण आलेया काई मरण असे:' असे मराठीत उद्गार काढले. सांप्रदायिक मताप्रमाणे चैत्र शु. ५ शके ११६२ (दि. १२ मार्च १२४०) रोजी श्रीचक्रधर स्वामींनी या विश्व अभयकर वचनाचा उच्चार केला. म्हणून महानुभाव पंथीय १२ मार्च हा दिवस 'विश्व मराठी दिन' म्हणून साजरा करतात. चक्रधरांच्या काळात प्रत्यक्षात वाङ्मय लेखन झालेले नाही. परंतु त्यांचे शिष्य महानुभाव पंथाचे पहिले आचार्य श्री नागदेवाचार्य यांच्या कालखंडात लीळाचरित्रापासून मराठीतील श्रेष्ठ ग्रंथांच्या निर्मितीचा प्रवाह सुरु झाला. श्रीचक्रधरांचे जीवनकार्य, विचार, मराठी भाषाविषयीचे प्रेम, जीव उद्धाराची तळमळ या साहित्यनिर्मितीला प्रेरक ठरलेली आहे.

श्रीचक्रधर स्वामींनंतर श्री नागदेवाचार्य यांनी महानुभाव पंथाची धुरा सांभाळली. ते कुशल संघटक होते. त्यांना ब्रह्मविद्येचे ज्ञान चक्रधरांपासून झालेले होते. माझ्या मागे तुझ्या मुखातून अशास्त्र कधीही निघणार नाही. जे निघेल ते माझ्या इच्छेनेच निघेल असे वरदान स्वामींनी त्यांना दिले होते. त्यामुळे महानुभावांच्या पंचकृष्णांइतकेच त्यांनाही वंदनीय मानले जाऊ लागले. 'आमच्या जवळून एक दोघांना आणि तुमच्या कडून सातापाचांना बोध होईल' असा आशीर्वाद श्रीचक्रधरांनी त्यांना दिला होता. श्रीचक्रधरांच्या हयातीत जे कार्य होऊ शकले नाही ते कार्य आचार्यांनी त्यांच्या पश्चात यशस्वी रितीने घडवून आणले. डॉ. वि. भि. कोलते म्हणतात, चक्रधरांच्या चरित्रात्मक लीळांची व तात्त्विक विचाररत्नांची शास्त्रीयदृष्ट्या विभागणी करुन त्यांना ग्रंथमंजूषेत साठवून ठेवण्याची जी कामगिरी म्हाइंभट, बाइदेवबास, केसोबास इत्यादीकांनी केली तिचे सर्व श्रेय अप्रत्यक्षपणे या आद्याचार्यांकडेच जाते. त्यांनी स्वत: कुठलाही ग्रंथ लिहिला नाही. परंतु त्यांच्या जवळून म्हाइंभट, केशिराज, भास्करभट्ट बोरीकर यांना ज्ञान झाले आणि म्हणूनच हा कवीवर्ग मराठी भाषेच्या प्रांगणात अजोड असे ग्रंथ रचना करु शकला. नागदेवाचार्यांना मात्र मराठी भाषेतूनच व्यवहार करण्याची प्रेरणा श्रीचक्रधर स्वामींपासून मिळाली होती.

श्रीचक्रधरांनी आपले ज्ञान मराठीतूनच सांगितले. श्रीचक्रधरांप्रमाणेच नागदेवाचार्यांना मराठीचा अभिमान होता, मराठी भाषेवर त्यांचे प्रेम होते. एकदा केशिराजव्यासांनी नागदेवाचार्यांना उद्धरण प्रकरण संस्कृतातून मांडण्याची आज्ञा मागितली. तेव्हा ते म्हणाले, 'नकोगा केशवदवा येणे माझिया म्हातारीचा नागवतिल' (स्मृती क्र. १५ स्मृतिस्थळ) संस्कृतमध्ये संभाषण करु इच्छिणाऱ्या शिष्यांना मराठीच्या अभिमानातून श्री नागदेवाचार्य म्हणतात, 'तुमचा अस्मात कस्मात मी नेणेगा: मज श्री चक्रधरे निरुपली मऱ्हाटी तियाचि पुसा:'(स्मृती क्र. ६६) अशा प्रकारचा त्यांचा आदेश असल्यामुळे लीळाचरित्रापासून अनेक ग्रंथ महानुभावांनी मराठीत लिहिलेले आहेत. सांप्रदायिक मतानुसार सुमारे ६५०० ग्रंथ महानुभाव पंथीयांनी मराठीत निर्माण करुन मराठी साहित्य भांडारात मोलाची भर टाकली आहे. यातील प्रमुख ग्रंथ पुढील प्रमाणे आहेत- लीळाचरित्र, महदंबेचे धवळे, श्री गोविंदप्रभू चरित्र, दृष्टांतपाठ, सूत्रपाठ, स्मृतिस्थळ, वृद्धाचार, पूजा अवसर स्तोत्र, रुक्मिणी स्वयंवर, शिशुपाल वध, उद्धवगीता, वच्छहरण, सह्याद्रिवर्णन, ज्ञानप्रबोध, ऋद्धिपूरवर्णन, मूर्तिप्रकाश, चौपद्या, स्थानपोथी या प्रमुख ग्रंथांसह विविध भाष्य-स्थळ-बंद ग्रंथ महानुभाव पंथीयांनी मराठी भाषेला दिले आहेत. विशेष म्हणजे त्यात गद्य ग्रंथांचे प्रमाण लक्षणीय आहे.

संस्कृत भाषेत चालणाऱ्या तत्वाचिंतनाची परंपरा मराठीत सुरु करावयाचे आड अनंत अडचणी येणार होत्या. तरीही महानुभाव पंथीयांनी श्रीचक्रधरांची आज्ञा पाळून मराठीत ग्रंथ रचना केली. ही ग्रंथरचना करणारे जवळजवळ सर्वच साहित्यिक संस्कृतचे पंडित आणि मराठी ही बोली भाषा असणारे होते. त्यांच्या दृष्टिने मराठीत रचना करणे वाटते तितके सोपे नव्हते. पहिली अडचण परिभाषेची होती. तत्त्वचिंतनातील कल्पनांच्या स्पष्टीकरणार्थ समर्पक संज्ञांची नव्याने निर्मिती करणे आवश्यक होते. ते कार्य मराठीत ग्रंथ लेखनाबरोबरच महानुभावीय तत्त्वचिंतकांना करावयाचे होते. अशा पारिभाषिक शब्दांचे अर्थ स्पष्ट व्हावेत म्हणून अर्थनिर्णायक टीका-ग्रंथ आणि शब्दकोष तयार करणे क्रमप्राप्त होते. टीका ग्रंथास न्याय आणि तर्कशास्त्राच्या अभ्यासाची जोड देऊन मराठी व्याकरणाची बैठक तयार करणेही आवश्यक होते. अनेक पिढ्यांनी खपून जे संस्कृतात निर्माण करुन ठेवले होते तेवढे आणि तसेच मराठीत निर्माण करुन ठेवावयाचे म्हणजे फार मोठे आव्हानच होते. परंतु श्रीचक्रधर स्वामींच्या प्रेरणा आणि आशीर्वादाने स्वामींच्या या साहित्यिक शिष्यांनी पिढ्यानपिढ्या खपून साहित्य क्षेत्रात एक चमत्कार घडवून



Scanned with CamScanner

आणला. त्यांनी मराठी बोल-भाषेला संस्कृताच्या तोडीचे साजशृंगार चढवून प्रौढत्व आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. तत्कालीन तत्त्वचिंतकांना मराठीत तत्त्वचिंतनाची तर्कसंगत ज्ञानचर्चा करणाऱ्या भाष्यांची, त्यासाठी लागणाऱ्या परिभाषेची गरज वाटली नसावी. परंतु महानुभाव पंथीयांनी मराठीला अपूर्व अशी ज्ञान चर्चेची परंपरा निर्माण करून ती आजवर टिकविली. अनेक तत्त्वचिंतकांनी आपल्या तर्कसंगत युक्तिवादाने तात्त्विक चर्चेच्या दालनात मराठी भाषेला नेऊन बसविले. मराठीची शब्दसंपत्ती वाढवून तिला समृद्ध केले. तिला प्रौढत्व आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. महानुभाव पंथीयांच्या या कार्यामागे श्री चक्रधरांचा आशीर्वाद आणि प्रेरणाच कारणीभूत होती. त्यामुळेच अभिजात मराठी भाषेतील श्रेष्ठ गद्य वाङ्मयाचे आदिकारण श्री चक्रधर स्वामी आहेत असे दिसते.

**संदर्भ :**


१) नरके हरी, 'अभिजात मराठी', **लोकराज्य,** फेब्रुवारी-२०१३

२) अवलगावकर रमेश, **केशिराज व्यास व्यक्ती आणि वाङ्मय,** आ. १ ली, औरंगाबाद , १९८३

३) नागपुरे पुरुषोत्तम, 'महानुभाव : एक साहित्यिक संप्रदाय', **महानुभाव** व-२७, अं-७, ऑक्टो. १९७५

४) देशपांडे सु. र., 'शोध प्राचीनत्वाचा', **लोकराज्य,** फेब्रुवारी- २०१३

५) भावे वि. ल., **महाराष्ट्र सारस्वत,** खंड-१, आ. ६ वी, मुंबई, १९८२


❑❑❑

24

# भूमिहीनांच्या संदर्भात दादासाहेब गायकवाड यांचे योगदान


**कांबळे विजयालक्ष्मी संभाजी**

मु.पो.शंकरनगर, ता.बिलोली, जि. नांदेड.


**********

प्रत्येक नेत्याच्या आयुष्यात त्याला अनेक चळवळीत भागीदारी करावी लागते.असे असलेतरी अशा अनेक प्रश्नांवरच्या विविध चळवळीपैकी कोणत्यातरी एका वैशिष्ट्यपूर्ण आंदोलनाशी या नेत्याचे नाव अभिन्नपणे जोडले जातेते एक ऐतिहासिक मुल्यमापन असते.

कर्मवीर दादासाहेबांचे नाते याच रितीने भूमिहीनाच्या जमिनीसाठी केलेल्या देशव्यापी अशा सत्याग्रह आंदोलनाशी जोडले गेले आहे आणि हे रास्तच आहे.

वास्तविक पाहता डॉ. आंबेडकरांच्या जीवनात त्यांनी जी जी आंदोलने त्यात कर्मवीर दादासाहेबांचा सतत सिंहाचा वाटा राहिला आहे. तथापि त्या आंदोलनाच्या वेळी डॉ. आंबेडकरांचे महावृक्षाच्या व्याप्तीचे उत्तुंग असे नेतृत्व होते. त्यामुळे इतर कुणाच्या नावाशी ती आंदोलने जोडली जाण्याचा प्रश्नच नव्हता.

आंबेडकरांच्या १९५६ साली झालेल्या निधनानंतर दलित नेतृत्वाखाली आजवर झालेल्या सर्व आंदोलनात सर्वात व्यापक आणि सर्वात मोठे असे आंदोलन भूमिहीनांचे आंदोलन झाले आणि त्याचे नेतृत्व निर्विवादपणे कर्मवीरांनी केलेहोते या आंदोलनात प्रामुख्याने आणि मोठ्या प्रमाणात दलित भूमिहीन सहभागी झाला होताहे खरे आहे. तथापि या देशव्यापी आंदोलनात दलितेतर भूमिहीन सुध्दा सहभागी झालेहोतेहे या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य होते.

सरकार जवळील पडीक जमीन भूमिहीनांना कसण्यास मिळावी या मागणीसाठी १९५८-५९ सालीहासत्याग्रह मराठवाड्यात सुरु झाला महाराष्ट्राच्या इतर भागातही हे आंदोलन सुरु झाले नाशिक व धुळे जिल्ह्यात त्याचा जोर अधिकहोता. आंदोलनाच्या तयारीसाठी कर्मवीर गायकवाडांबरोबर क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी सभा घेतल्या होत्या.कर्मवीर गायकवाड आणि मराठवाड्याचे पक्षाचे अध्यक्ष श्री बी.एस. मोरे यांना या आंदोलनात ४/४ महिन्यांची शिक्षा झाली आणि त्यांना औरंगाबाद येथील तुरुंगात ठेवण्यात आले औरंगाबाद येथील जेलमध्ये एकावेळी ३०००



Scanned with CamScanner